# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.03.2026** **वारः शुक्रवार**

1. गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाच्या मुहूर्तावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्या हस्ते काल अयोध्येत श्रीराम यंत्राची स्थापना
2. देशात तीन दिवसांत साडेपाच हजाराहून अधिक ग्राहकांची पाईप गॅस जोडणीला पसंती
3. इराणविरुद्धच्या लष्करी मोहिमेद्वारे इस्रायल आणि अमेरिका संपूर्ण जगाचं संरक्षण करत आहेत, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचं प्रतिपादन
4. महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातल्या 11 जहाल नक्षलवाद्यांची शरणागती आणि
5. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ऑर्लिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**श्रीरामयंत्र**

गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाच्या मुहूर्तावर अयोध्येत काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चाराच्या गजरात श्रीराम यंत्राची स्थापना करण्यात आली. राष्ट्रपतींनी काल या परिसरातल्या विविध मंदिरांमध्ये दर्शन घेतलं. आपण एकाच भावनेनं देशासाठी प्रार्थना करतो आणि श्रीरामांची आराधना करतो अशा शब्दात त्यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केलं. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. अयोध्येत स्थापन केलेले श्रीराम यंत्र कांची कामकोटी पीठाकडून प्रदान करण्यात आलं असून ते वैदिक गणित आणि भौमितिक रचनांवर आधारित आहे.

**पंतप्रधान चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राच्या विश्वस्तांची भेट घेऊन देशाच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचा आणखी प्रचार करण्याच्या मुद्द्यावर चर्चा केली. या प्रवासात अधिकाधिक लोकांशी जोडण्याचे मार्ग, आणि देशाचा समृद्ध वारसा जपण्यासाठी आणि त्याचा प्रचार करण्यासाठी कलाकार आणि तज्ज्ञांना सहाय्य देण्याच्या मार्गांवरही चर्चा केली असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे.

**मोदी-कतार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कतारचे अमीर शेख तमीम बिन हमाद अल थानी यांच्याशी काल दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांना आणि कतारच्या जनतेला ईदच्या शुभेच्छा दिल्या. भारत कतारच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून या क्षेत्रातील ऊर्जा पायाभूत सुविधांवर झालेल्या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध करतो, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. यावेळी भारतीय समुदायाला दिलेल्या काळजी आणि पाठिंब्याबद्दल पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली. भारत आणि कतार हे दोन्ही देश 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तून सुरक्षित आणि मुक्त नौवहनाच्या बाजूनं ठामपणे उभे आहेत, असंही मोदी यांनी सांगितलं आहे.

**पाईप गॅस जोडण्या**

देशात गेल्या तीन दिवसांत साडेपाच हजाराहून अधिक ग्राहकांनी पाईप गॅस जोडणीला पसंती दिल्याची माहिती पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी काल दिली. दिल्लीत आखाती प्रदेशातल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीत शर्मा यांनी गेल्या दोन आठवड्यात सव्वा लाख घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठीच्या पाईप गॅस जोडण्या वितरीत करण्यात आल्याचीही माहिती

दिली. देशभरात घरगुती वापरासाठीचा पीएनजी आणि वाहतुकीच्या वापरासाठीचा सीएनजी दोन्ही वायूंचा 100 टक्के पुरवठा सुनिश्चित करण्यात आला असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**शेअर बाजार**

शेअर बाजारात काल झालेल्या मोठ्या घसरणीमुळं शेअर बाजाराचा निर्देशांक काल 2 हजार 497 अंकांनी घसरुन 74 हजार 207 अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्येही 776 अंकांची घट होऊन तो 23 हजार 2 अंकांवर बंद झाला. गेल्या पावणे 2 वर्षातली शेअर बाजारातली ही सर्वात मोठी घसरण आहे. तेलाच्या वाढत्या किंमती, जागतिक पातळीवर कमकुवत वातावरण, यामुळं या घसरणीत वाढ झाली.

**डीफेन्स**

एकात्मिक संरक्षण दल मुख्यालय आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचं अवकाश अनुप्रयोग केंदर केंद्र यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार सशस्त्र दलांसाठी विद्यमान उपग्रह-आधारित दूरसंचार नोड्सच्या देखभालीसाठी आणि अतिरिक्त नोड्सच्या तरतुदीसाठी हा करार करण्यात आला असून एकात्मिक संरक्षण दलाचे उपप्रमुख एअर मार्शल शंकर सुब्रमण्यन आणि अवकाश अनुप्रयोग केंद्राचे संचालक निलेश एम. देसाई यांनी स्वाक्षरी केली.

**इस्रायल-नेतान्याहू**

इराणविरुद्धच्या आपल्या लष्करी मोहिमेद्वारे इस्रायल आणि अमेरिका संपूर्ण जगाचे संरक्षण करत आहेत, असं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. ते काल जेरुसलेममध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. इस्रायली हल्ल्यांमुळे इराणची लष्करी क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली असून नेतान्याहू यांनी दावा केला की, तेहरान आता युरेनियमचं संवर्धन करू शकत नाही किंवा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे तयार करू शकत नाही. महत्त्वाच्या जागतिक तेल मार्गात अडथळा आणून इराण जगाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत असे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, असं नेतान्याहू यांनी सांगितलं.

**पेंटागॉन-इराण**

दरम्यान, पेंटागॉन या अमेरिकेच्या संरक्षण विभागानं इराण युद्धासाठी अमेरिकन काँग्रेसकडे 200 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या अतिरिक्त निधीची मागणी केली आहे.

**परराष्ट्र मंत्रालय**

आखाती प्रदेशातील ऊर्जा प्रकल्पांवर झालेल्या अलीकडील हल्ल्यांबद्दल भारतानं चिंता व्यक्त केली असून, हे हल्ले अत्यंत चिंताजनक आहे, असं मत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत आखाती प्रदेशातील ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांसंदर्भात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. या हल्ल्यांमुळे आधीच अनिश्चित असलेल्या जागतिक ऊर्जा परिस्थितीत आणखी अस्थिरता निर्माण होण्याचा धोका आहे, असं ते म्हणाले. ऊर्जा पुरवठा ही एक मोठी चिंतेची बाब असून, जलवाहतुकीच्या मार्गांवरही परिणाम होत आहे. ते म्हणाले की, एलपीजीच्या उपलब्धतेवर लक्ष ठेवलं जात असून, सरकार घरगुती ग्राहकांना प्राधान्य देत आहे आणि ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणण्यासाठी सक्रियपणे काम करत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये भारताची 22 जहाजं असून त्यावर 611 भारतीय खलाशी आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी भारत त्यांच्या कंपन्यांच्या संपर्कात असून अनेक खलाशी परत आले आहेत. तर इराणमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांविषयी बोलताना, रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं की, काश्मीरमधील मुलींसह मोठ्या संख्येनं भारतीय विद्यार्थी इराणमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असून त्यांना मदत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

**नक्षली आत्मसमर्पण-गडचिरोली**

महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातील विविध दलम् मधल्या 11 जहाल नक्षलवाद्यांनी काल गडचिरोली पोलिसांसमोर शस्त्रं खाली ठेवली. या सर्वांवर 68 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. यामध्ये एक विभागीय

समिती सदस्य, एक क्षेत्र समिती सचिव, एक प्लाटून पार्टी सदस्य, एक कमांडर, एक क्षेत्र समिती सदस्य आणि अन्य सहा दलम सदस्यांचा समावेश आहे.

**पुदुच्चेरी निवडणुक**

पुदुच्चेरी विधानसभेच्या 2026 च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा एक भाग म्हणून पुदुच्चेरी आणि कराईकल जिल्ह्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट युनिट्सचं पहिलं यादृच्छिकीकरण यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलं आहे. ही प्रक्रिया संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी तसंच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडली. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटचं विधानसभा मतदारसंघनिहाय वाटप करण्यात आलं.

**केरळ उमेदवार यादी**

केरळममधल्या आगामी विधानसभा निवडणुकांसाठी काँग्रेस पक्षानं 37 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. पक्षानं अरुविकरा मतदारसंघातून ज्येष्ठ काँग्रेस नेते व्ही. एस. शिवकुमार यांना उमेदवारी दिली आहे. तर माजी आमदार के. एस. सबरीनाधन, नेमम मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. या यादीमध्ये त्रिकारिपूर मतदारसंघातून संदीप वरीअर, कोच्चीहून मोहम्मद शियास, एट्टुमानूरहून नट्टाकोम सुरेश, आणि अरनमुला मतदारसंघातून राज्य युवक काँग्रेसचे सचिव अबिन वर्की यांचा समावेश आहे. याआधी, काँग्रेसनं 55 उमेदवारांची यादी जाहीर केली होती. केरळध्ये विधानसभेच्या निवडणुकीसाठी येत्या 9 एप्रिलला मतदान होणार असून, मतमोजणी 4 मे रोजी होणार आहे.

**बॅडमिंटन**

फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ऑर्लिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत,तन्वी शर्मा, इशाराणी बरुआ आणि मालविका बनसोड या  भारतीय खेळाडूंनी 'पॅलेस डे स्पोर्ट्स' इथं महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. महिला एकेरीच्या अंतिम 16 सामन्यांमध्ये, तन्वीनं भारताच्याच अनमोल खरबचा पराभव केला; तर इशाराणी बरुआनं कॅनडाच्या वेन यू झांगचा पराभव केला. आणखी एका सामन्यात, मालविका बनसोडनं मलेशियाच्या वोंग लिंग चिंगचा केला.

दुसरीकडे अर्जुन मदाथिल रामचंद्रन आणि हरिहरन अमसकारुणन या भारतीय पुरुष दुहेरी जोडीनंही फ्रान्समधील 'पॅलेस डे स्पोर्ट्स' मध्ये उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष एकेरीमध्ये मात्र, आयुष शेट्टीला जपानच्या युदाई ओकिमोतोकडून पराभव स्वीकारावा लागला.

**हवामान**

महाराष्ट्रात, काल विविध जिल्ह्यांमध्ये पुन्हा एकदा अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या उपहिमालयीन क्षेत्रात आज अतिवृष्टीची शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये पावसाची संततधार राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस आणि कडक्याच्या थंडीतही काल नवरात्रीच्या पहिल्या दिवशी हजारो भाविकांनी वैष्णवदेवीचं दर्शन घेतलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.